संक्षिप्त फौ.ख.क्र.४३१/२०२५
सरकार –वि– प्रविण
नि. क्र. ०५ खाली
CNR NO. - MHCH170007102025

# –न्यायनिर्णय–

(आज दिनांक ०२ मे २०२६ रोजी घोषीत)

आरोपीविरुध्द कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारूबंदी कायद्याअंतर्गत दंडनिय अपराधाकरीता आरोप ठेवण्यात आले.

२. अभिलेखावर उपलब्ध असलेल्या साहीत्यावरून माझ्यासमक्ष विचाराधिन मुद्दे आणि निष्कर्ष कारणमीमांसासह खालील प्रमाणे आहे:–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, दिनांक २५.०२.२०२५ रोजी ०९.२० वाजताचे सुमारास मौजा नेरी, ता. चिमूर येथे आरोपीच्या ताब्यातून ९० मिलीच्या ५४ नग देशी दारुच्या शिश्या मिळुन आल्या? | **नाही** |
| २ | कुठला गुन्हा शाबीत झाला काय? | **नाही** |
| ३ | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र. १ ते ३:**

३. अभियोग पक्षाने आपली बाजू सिध्द करण्याकरिता केवळ एक साक्षीदार म्हणजे पंच – महेश हरीचंद्र मुरकुटे (सा.क्र.०१) याची साक्ष नोंदविली. वारंवार संधी देवुन सुध्दा अभियोग पक्षाने इतर साक्षीदारांची साक्ष न तपासल्यामुळे अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीविरुध्द कुठलाही गुन्हा दर्शक पुरावा मिळून न आल्यामुळे त्याचे कलम ३१३ फौ.प्र.सं. अन्वयेचे बयाण विसर्जीत करण्यात आले.

४. पंच महेश (सा.क्र.०१) याने त्याच्या सरतपासामध्ये कथन केले आहे की, दिनांक २५.०२.२०२५ रोजी पोलीसांनी त्याला पंच म्हणुन कुठेही बोलविले नव्हते. त्याच्या समक्ष कुठलीही जप्ती करण्यात आली नव्हती. पोलीसांनी त्याची सही रस्त्यावर घेतली होती. यावरुन असे दिसुन येते की, सदर साक्षीदाराला प्रस्तुत प्रकरणामध्ये मुद्देमालाच्या जप्तीबददल काहीही माहिती नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष अभियोग पक्षाला आरोपीचा गुन्हा सिध्द करण्याकरीता तीळमात्रही उपयुक्त नाही.

५. अशा प्रकरणात स्वतत्र पंच साक्षदाराची साक्ष महत्वाची असते. परंतु, या प्रकरणातील पंच महेश (सा.क्र.०१) याची साक्ष लक्षात घेता असे निदर्शनास येते की, अभियोग पक्षाने आरोपीच्या ताब्यातून ९० मिलीच्या ५४ नग देशी दारुच्या शिश्या जप्त केल्या हे सिध्द केले नाही. यावरुन असे स्पष्ट होते की, अभियोग पक्ष हे सिध्द करण्यास अपयशी ठरला की, घटनेच्या वेळी आरोपीने ९० मिलीच्या ५४ नग देशी दारुच्या शिश्या बिना परवाना अवैधरित्या बाळगल्या. सदर प्रकरणामध्ये अभियोग पक्षाने रासायनीक विश्लेषणाचा अहवाल दाखल केलेला आहे. परंतु अभियोग पक्षाने तथाकथित दारुचा नमुना न्याय वैद्यक प्रयोगशाळेमध्ये घेऊन जाणा–या वाहकाला तपासलेले नाही. म्हणुन अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत केला असे ग्राहय धरता येणार नाही. म्हणुन मला असे वाटते की, अभियोग पक्ष आरोपीविरुध्द वरील कलमान्वये गुन्हा सिध्द करण्यास अपयशी ठरला. म्हणुन मी मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी देत आहे आणि मुद्दा क्रमांक ३ ला अनुसरुन खालील आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी – प्रविण विनायक नगराळे याची महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) च्या गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

संक्षिप्त फौ.ख.क्र.४३१/२०२५
सरकार –वि– प्रविण
नि. क्र. ०५ खाली
CNR NO. - MHCH170007102025

२. सदर प्रकरणामध्ये आरोपीने दिलेली पुर्वीची जमानत कलम ४३७–अ फौ.प्र.सं. अन्वयेच्या पुर्ततेकरीता पुढील सहा महीन्यांकरीता ग्राहय धरण्यात येईल.

३. जप्ती पंचनाम्याप्रमाणे जप्त केलेल्या ९० मिलीच्या ५४ नग देशी दारुच्या शिश्या राज्य उत्पादन शुल्क, चंद्रपूर यांचेकडे आवाहन कालावधीनंतर विल्हेवाट लावण्याकरीता पाठविण्यात याव्या. उर्वरित मुद्देमाल मुल्यहिन असल्यामुळे आवाहन कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर व टंकलिखीत)

RUSHIKESH DILIP BHUYARKAR
Digitally signed by RUSHIKESH DILIP BHUYARKAR
Date: 2026.05.02 15:14:27 +0530

स्थळः चिमूर (आर. डी. भुयारकर)
दि.०२/०५/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, चिमूर.